..महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाची नवी श्वेतक्रांती (पान २ वर)

१९ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करणारे साप्ताहिक

# प्रगत भारत

Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbharat Email-pragatbharat@gmail.com,mob.9860877789

• वर्ष:१९ • अंक क्र.१४ • साप्ताहिक • मंगळवार दि.२२ ते २८ सप्टेंबर २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट-PCE/006/2024-26 • पृष्ठे-४ • किंमत:२.००




# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त 'मराठवाडा भूषण' पुरस्कारांचे वितरण

## मराठवाडा जनविकास संघ आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम महोत्सव समिती,पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने आयोजन



**पिंपरी:**-मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून मराठवाडा जनविकास संघ(महाराष्ट्र राज्य) आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम महोत्सव समिती,पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.दरम्यान,मराठवाड्याच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा देतानाच आजच्या मराठवाड्यापुढील सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक,सिंचन व रोजगार प्रश्नांवर विचारमंथन करण्यात आले.

काळेवाडी येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण उपसंचालक डॉ.गणपतराव मोरे होते. कार्यक्रमाचे उदघाटन मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालयाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांच्या हस्ते झाले.प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विवेक मुंगळीकर,सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉ.राधाकिशन पवार,मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अरुण पवार,शारदाताई मुंढे,नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, गोपाळ माळेकर, सूर्यकांत कुरुलकर,वामन भरगंडे, दत्तात्रय धोंडगे,नाना तांबारे,नरेंद्र माने,युवराज माने,प्रकाश इंगोले, बाळासाहेब साळुंखे, दिनेश पवार, महादेव स्वामी,किशोर अटगेकर, अंगद जाधव, भैरूजी मंडले, अनिता पांचाळ,कॅप्टन बालाजी पांचाळ, केशव बोधले,गोरख पाटील, सुग्रीव पाटील,लक्ष्मण जाधव, राधेश्याम शिंदे,संतोष भोरे,कृष्णा जाधवर यांच्यासह मराठवाडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धनाजीराव येळकर पाटील म्हणाले, की जुलमी निजामशाहीच्या जोखडातून मुक्त होऊन स्वतंत्र भारतात येऊन ७८ वर्षे झालेला मराठवाडा आजही उपेक्षित,मागास आणि तहानलेलाच आहे.सिंचन क्षेत्रातील अनुशेष भरून न निघाल्याने पाण्याची टंचाई आहे.पाण्याच्या उपलब्धते अभावी उद्योगधंद्यांना अपेक्षित चालना मिळत नाही. त्यामुळे दरडोई उत्पन्न कमीराहते. उच्च शिक्षण,रोजगार,व्यवसाय आणि धंद्यासाठी मराठवाड्यातील नागरिकांना इतर ठिकाणी स्थलांतर करावे लागत आहे.त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करणे आणि उच्च शिक्षणाच्या सुविधा वाढविणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील या परिस्थितीमागे येथील नेतृत्वाचे अपयश आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

प्रास्ताविकात अरुण पवार यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास, त्या लढ्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि मराठवाड्याच्या विकासासाठी आजच्या पिढीची असलेली जबाबदारी याबाबत भूमिका मांडली.ते म्हणाले,की मराठवाडा मुक्तिसंग्राम हा केवळ इतिहासातील एक अध्याय नसून स्वातंत्र्य,स्वाभिमान आणि लोकशाही मूल्यांसाठी दिलेल्या संघर्षाची प्रेरणादायी गाथा आहे. त्या संघर्षातून प्रेरणा घेऊन आज मराठवाड्याच्या विकासासाठी काम करण्याची गरज आहे.

डॉ.गणपतराव मोरे म्हणाले, की मराठवाड्याच्या विकासात शिक्षण क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे.शिक्षणामुळे व्यक्तीच्या आयुष्याला दिशा मिळते आणि शिक्षित समाजातूनच व्यापक समाज परिवर्तन घडू शकते. मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण,कौशल्यविकास आणि रोजगाराभिमुख शिक्षणाच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

भाऊसाहेब जाधव म्हणाले, की मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागामुळे आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेतआहोत.या इतिहासाची जपणूक करून तो पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी शासनाबरोबरच समाजातील सर्वच घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.समाजातील सकारात्मक शक्तींना एकत्र आणून विकासाचा नवा मार्ग निर्माण करण्याची गरज असल्याचे जाधव यांनी सांगितले.

डॉ.विवेक मुंगळीकर यांनी सामाजिक बांधिलकीचे महत्त्व सांगत समाजाच्या विकासासाठी प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखून काम करणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील युवकांमध्ये मोठी क्षमता असून,योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास ते विविध क्षेत्रांत यश मिळवू शकतात.

पुरस्काराला उत्तर देताना विक्रम गायकवाड यांनी मराठवाड्यातील युवकांमध्ये मोठी क्षमता असून योग्य मार्गदर्शन,कौशल्य आणि संधी मिळाल्यास उद्योग क्षेत्रातही मराठवाड्याची नवी ओळख निर्माण होऊ शकते, असा विश्वास व्यक्त केला.

प्रास्ताविक अरुण पवार यांनी केले. सूत्रसंचालन अतुल क्षीरसागर यांनी, तर प्रकाश इंगोले यांनी आभार मानले.मराठवाडा भूषण पुरस्काराने मान्यवरांचा सन्मान..उद्योग क्षेत्रातील योगदानाबद्दल विक्रम डेव्हलपर्सचे विक्रम गायकवाड यांचा,सामाजिक क्षेत्रासाठी स्नेहवन संस्थेच्या अर्चना देशमुख,अभिषेक इलेक्ट्रिकल्स व कन्स्ट्रक्शनचे दयानंद बळकटे, स्वातंत्र्य सेनानी स्व.माधवराव शामराव माने,कृषी क्षेत्रासाठी भाई धनंजय उद्धवराव पाटील,कला क्षेत्रासाठी बाल कलाकार अक्षता सूर्यवंशी यांचा 'मराठवाडा भूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेचा

## ४४ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा होणार



**पिंपरी:**-पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अधिकारी-कर्मचारी केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.महानगरपालिकेच्या स्थापने-पासून आज पर्यंतच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेणे,शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणे तसेच नागरिकाभिमुख प्रशासन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.

महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी ११ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येतो.यंदा ११ ऑक्टोबर रोजी रविवार व साप्ताहिक सुट्टी असल्यामुळे मुख्य वर्धापन दिन कार्यक्रम सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत,पिंपरी तसेच प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे. वर्धापन दिनाच्या पूर्वतयारी व नियोजनासंदर्भात महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली.

बैठकीस सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, प्रभाग अध्यक्ष निखील बो-हाडे, नगरसदस्य राजू मिसाळ, विकास साने, निलेश तरस, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच शशिकांत झिंजुर्डे, उमेश बांदल, मंगेश कलापुरे, चंद्रशेखर गावडे, नितीन समगीर, लाला गाडे, विश्वनाथ लांडगे, राजाराम लांडे, मदन चिंचवडे, किशोर आठवाल, अनिल लखन आणि राकेश चव्हाण आदी उपस्थित होते. औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराचा आधुनिक व विकसित शहराच्या दिशेने झालेलाप्रवास हा नागरिक,लोकप्रतिनिधी,अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सामूहिक सहभागातून साध्य झाला आहे. या विकासप्रवासाचा आढावा घेण्यासोबतच आगामी काळातील शहराच्या गरजा लक्षात घेऊन नागरिककेंद्रित,पारदर्शक, गतिमान आणि गुणवत्तापूर्ण प्रशासन अधिक सक्षम करण्याचा संकल्प वर्धापन दिनाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे.

महापौर रवि लांडगे म्हणाले, ''पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन हा शहराच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेण्याबरोबरच या प्रवासात योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाच्या कार्याची दखल घेण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे.नागरिकांचा सहभाग, लोकप्रतिनिधींचे सहकार्य आणि महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून शहराच्या विकासाला सातत्याने गती मिळाली आहे. वर्धापन दिनाच्या निमित्ताने अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासोबतच विविध सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांमधून त्यांचासहभाग वाढविण्यात येणार आहे.'' वर्धापन दिनानिमित्त नगरीचे शिल्पकार अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यासोबत रक्तदान शिबिर,महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विशेष उपक्रम, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी चहापान व अल्पोपहार, कर्मचारी ऑर्केस्ट्रा, गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार तसेच विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव आदी कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे.महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पाककला व रांगोळी स्पर्धांसह विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच संगीत खुर्ची,रस्सीखेच व अन्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.फॅन्सी ड्रेस,पाककला, रांगोळी तसेच अन्य स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार असून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहभागातून सादर करण्यात येणारा सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्याचे नियोजन आहे.महानगरपालिकेच्या विविध कार्यालये व विभागांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करून त्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्याचे प्रस्तावित आहे.माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निमंत्रण पत्रिका,प्रसिद्धी, छायाचित्रण, व्हिडिओ चित्रीकरण,एलईडी स्क्रीन तसेच आवश्यक समन्वयाची कार्यवाही करण्यात येणार आहे. उद्यान विभागामार्फत पुष्पसजावट, स्थापत्य विभागामार्फत स्वागत कमान, मंडप, मंच, टेबल व खुर्च्यांची व्यवस्था, तर विद्युत विभागामार्फत ध्वनिक्षेपण व्यवस्था, कॉर्डलेस माईक व आवश्यक विद्युत रोषणाईची व्यवस्था करण्यात येणार आहे.आरोग्य विभागामार्फत कार्यक्रमस्थळाची स्वच्छता व साफसफाई, सुरक्षा विभागामार्फत आवश्यक सुरक्षा व्यवस्था, तर आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन विभागामार्फत आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने आवश्यक पूर्वतयारी करण्यात येणार आहे. वैद्यकीय विभागामार्फत रक्तदान शिबिरासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा व समन्वय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.महानगरपालिकेने वर्षभरात राबविलेली विविध विकासकामे,प्रकल्प,योजना आणि नागरिकाभिमुख उपक्रमांची माहिती वर्धापन दिनाच्या निमित्ताने नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. सोशल मीडिया तसेच शहरा

(पान ३ वर)

# विद्यार्थ्यांकडून आयुक्त नवल किशोर राम यांचा अनोखा सन्मान!



**पुणे:**-पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या वतीने विद्यार्थ्यांनी गुरुवारी (ता.१७) महापालिका भवन कार्यालयात जाऊन त्यांचा अनोख्या पद्धतीने सन्मान केला. विद्यार्थ्यांनी आयुक्तांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत स्वतःतयार केलेली ग्रीटिंग कार्ड्स भेट दिली. विद्यार्थ्यांच्या या आपुलकीच्या उपक्रमामुळे आयुक्त नवल किशोर राम भावूक झाले.चलवादी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी यावेळी आयुक्तांचा शाल,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ आणि भारतीय संविधानाची प्रत देऊन सन्मान केला व त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांनी केलेल्या सत्काराचे आयुक्तांनी विशेष कौतुक केले.पुणे महानगरपालिकेच्या सभागृहालाही भेट दिली.कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी प्राचार्य स्मिता लोंढे,शिल्पा गायधने, प्रशांत निकम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेचे उपसभापती नानासाहेब आबनावे यांचा जाहिर सत्कार

दररोजच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbharat.com
संपर्क मो-९८६०८७७७८९

**पुणे:**-कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे च्या उपसभापतीपदी सामाजिक व राजकीय अनुभव असलेले नानासाहेब आबनावे यांची निवड बिनविरोध झाल्याबद्दल श्री संतदेवजी बाबा मंदिर हराळे वैष्णव पुणे संस्थेच्या वतीने संस्थेचे सचिव राजेंद्र सोनवणे व पदाधिकाऱ्यांनी नानासाहेब आबनावे यांना पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



ॐ कारं बिन्दू संयुक्त नित्यं धायन्ति योगिना:।।कामद मोक्षदं चैव ॐ काराय नमो नम :।।

# संपादकीय

## डिजिटल भारत घडवा; पण सामान्य माणसाचा खिसा जाळून नव्हे!

**भारताच्या प्रत्येक राज्यात पोहचलेले व आपल्या आर्थिक नियोजनाच्या व बैठकीमधील नव्या यूपीआय शुल्करचनेत १५ ऑक्टोबर २०२६ पासून २००० पेक्षा अधिक मूल्याच्या विशिष्ट व्यापारी यूपीआय व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर) लागू होणार असल्यामुळे नागरिक,व्यापारी आणि डिजिटल पेमेंट क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.या निर्णयामुळे ग्राहकांवर शुल्काचा बोजा पडणार का,व्यापारी पुन्हा रोख व्यवहारांना प्राधान्य देतील का,डिजिटल पेमेंटचा विस्तार मंदावेल का आणि या निर्णयामागे अमेरिकेचा दबाव आहे का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.**

**यूपीआय प्रणालीचे संचालन नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) करते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि भारतीय बँकिंग व्यवस्थेच्या नियामक चौकटीत ही प्रणाली कार्यरत आहे.व्यक्ती–ते–व्यक्ती (२) आणि व्यक्ती–ते–व्यापारी (२) हे तिच्या व्यवहारांचे दोन महत्त्वाचे प्रकार आहेत.एमडीआर म्हणजे व्यापाऱ्याने डिजिटल पेमेंट स्वीकारण्यासाठी संबंधित पेमेंट सेवा पुरवठादारांना द्यायचे शुल्क.हे ग्राहकाकडून आकारले जाणारे स्वतंत्र व्यवहारशुल्क किंवा सरकारी कर यांच्याशी समान नाही.व्यापाऱ्याला डिजिटल पेमेंट स्वीकारताना होणारा खर्च, त्याचे प्रमाण आणि शुल्काची रचना यांचा या चर्चेशी संबंध आहे. यूपीआयच्या व्यवहारांचे विश्लेषण करताना व्यवहारांची संख्या आणि एकूण आर्थिक मूल्य यांतील फरक लक्षात घ्यावा लागतो. उपलब्ध आकडेवारीनुसार,२०२५–२६ मध्ये २००० पेक्षा अधिक रकमेचे व्यवहार एकूण व्यापारी यूपीआय व्यवहारांच्या संख्येच्या सुमारे चार टक्के होते; मात्र त्यांच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक व्यवहारांचे मूल्य एकूण मूल्याच्या जवळपास दोन–तृतीयांश होते.याचा अर्थ, दैनंदिन लहान खरेदी–विक्रीत यूपीआयचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असला,तरी मोठ्या आर्थिक व्यवहारांमध्येही या प्रणालीचे महत्त्व वाढले आहे.त्यामुळे शुल्करचनेतील बदलाचा परिणाम केवळ मोठ्या व्यापाऱ्यांपुरता मर्यादित राहणार नाही;त्याचा अप्रत्यक्ष परिणाम डिजिटल पेमेंट स्वीकारण्याच्या व्यावसायिक निर्णयांवरही होऊ शकतो. केंद्र सरकारच्या १५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, नव्या चौकटीत व्यक्ती–ते–व्यक्ती व्यवहार विनामूल्य राहतील. २००० पर्यंतचे व्यापारी व्यवहार आणि शून्य एमडीआर चौकटीत येणारे लहान व्यापाऱ्यांचे व्यवहारही शुल्कमुक्त राहतील. सरकारच्या मते, त्यामुळे सुमारे ९६ टक्के व्यापारी व्यवहारांवर नव्या शुल्काचा परिणाम होणार नाही.मोठ्या व्यवहारांमध्ये शुल्काचा प्रश्न ग्राहकांच्या निर्णयावर प्रभाव टाकू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या ग्राहकाला मोठ्या खरेदीसाठी यूपीआय आणि रोख या दोन पर्यायांपैकी निवड करावी लागली, तर तो व्यवहाराची सोय, सुरक्षितता, उपलब्ध रोख रक्कम आणि व्यापाऱ्याचे धोरण यांचा विचार करू शकतो. तथापि, रोख व्यवहार वाढतील किंवा यूपीआयचा वापर घटेल, असा निष्कर्ष काढण्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणीनंतरची आकडेवारी आवश्यक आहे.**

**ग्राहकांचा प्रतिसाद,व्यापाऱ्यांची शुल्क स्वीकारण्याची क्षमता आणि डिजिटल पेमेंटच्या इतर पर्यायांची उपलब्धता यांवर परिणाम अवलंबून असेल.त्यामुळे अमेरिकेच्या दबावामुळेच हा निर्णय घेण्यात आला, असे सिद्ध झालेले नाही.त्याचप्रमाणे, केवळ सरकारी स्पष्टीकरणाच्या आधारे सर्व संभाव्य आंतरराष्ट्रीय आर्थिक संदर्भांचा स्वतंत्र विचार अनावश्यक ठरत नाही.आरोप, सरकारी भूमिका आणि त्यांना पुष्टी देणारे दस्तऐवजी पुरावे यांची वेगवेगळी चिकित्सा करणे आवश्यक आहे.सरकारच्या म्हणण्यानुसार हा ग्राहकांवर लावलेला कर नाही. परंतु व्यापाऱ्याच्या खर्चात वाढ झाली आणि परिणामी वस्तूंच्या किमतीत वाढ झाली तर तो अंतिमत:ग्राहकावरच भार पडणार आहे. हा भार थेट दिसणार नाही;पण महिन्याच्या शेवटी घरखर्चाच्या वाढलेल्या आकड्यात जाणवणार.यामुळे सरकारने केवळ 'ग्राहकांकडून थेट शुल्क घेतले जाणार नाही' एवढे सांगून थांबता कामा नये.या शुल्काचा अप्रत्यक्ष भार ग्राहकांवर टाकला जाणार नाही,यासाठी प्रभावी नियंत्रण यंत्रणा काय आहे, हेही जनतेला सांगणे गरजेचे आहे.महागाईने सामान्य माणसाचे आर्थिक गणित पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. घरभाडे, वीजबिल, शिक्षण,आरोग्य,प्रवास,इंधन,किराणा आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या खर्चाचा ताळमेळ घालताना कुटुंबांची दमछाक होत आहे. उत्पन्नाच्या तुलनेत खर्च वाढत असताना प्रत्येक एक एक रुपयाचे महत्त्व वाढले आहे.**

**दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे छोट्या व्यापाऱ्यांचे हित.मोठ्या व्यावसायिक संस्थांना व्यवहारातील खर्च पेलणे तुलनेने शक्य असू शकते;परंतु छोटा दुकानदार, किरकोळ व्यापारी, लघुउद्योजक यांच्यासाठी प्रत्येक खर्च महत्त्वाचा असतो. त्यांच्या व्यवहारांवर अनावश्यक आर्थिक भार पडला तर त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर होऊ शकतो.जनतेच्या मनात 'डिजिटल पेमेंट केले तर शुल्क वाढेल का?' अशी भीती निर्माण होता कामा नये.डिजिटल व्यवहार हा नागरिकांवर लादलेला पर्याय नसून त्यांची सोय आहे,अशी जनतेची भावना राहिली पाहिजे.आज सामान्य माणूस आधीच महागाईच्या आगीत होरपळत आहे.त्यात कोणत्याही नव्या शुल्काचा थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम त्याच्यावर झाला तर परिस्थिती आणखी कठीण होईल.महागाईने आधीच पोळलेल्या जनतेला डिजिटल व्यवहाराच्या नावाखाली आणखी एका आर्थिक झळेचा सामना करावा लागू नये. कारण डिजिटल भारत घडवा; पण सामान्य माणसाचा खिसा जाळून नव्हे!**

**यूपीआयचे भविष्य शुल्क असावे की नसावे,या एकाच प्रश्नावर अवलंबून नाही.डिजिटल पेमेंट सर्वसामान्यांना परवडणारे,सुरक्षित आणि सहज उपलब्ध राहते का,तसेच त्यामागील व्यवस्था आर्थिकदृष्ट्या टिकाऊ बनते का,यावर त्याची दिशा ठरेल.नव्या यूपीआय धोरणाची खरी कसोटी हीच असेल.**

## गोठ्यातील पारंपरिक पशुपालनापासून प्रयोगशाळेतील भ्रूणनिर्मितीपर्यंत महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाची नवी श्वेतक्रांती

**हजारो वर्षांपूर्वी मानवाने जंगलातील प्राण्यांना आपल्या सहजीवनाचा भाग बनविले. शेती सुरू झाली,स्थिर वस्ती निर्माण झाली आणि त्याचबरोबर पशुपालनाची संस्कृती विकसित झाली.गाय,म्हैस यांसारखे प्राणी केवळ अन्नाचा स्रोत राहिले नाहीत;ते शेती,दूध,वाहतूक,खत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधार बनले. त्या काळातील पशुपालकाला कोणते जनावर अधिक दूध देते, कोणते अधिक ताकदवान आहे किंवा कोणते वातावरणाशी जुळवून घेते,याचा अनुभवातून अंदाज घ्यावा लागत होता.**

आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.पूर्वी पशुपालक अनुभवाच्या आधारे उत्तम जनावर निवडत होता;आज विज्ञान जनावराच्या आनुवंशिक गुणवत्तेचा अभ्यास करून पुढील पिढी कशी असावी,हे ठरविण्याच्या टप्प्यावर पोहोचले आहे. हजारो वर्षांच्या पशुपालन परंपरेने आता प्रयोगशाळेतील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साथ घेतली आहे. महाराष्ट्रातील दुग्धव्यवसायात लिंग निश्चित वीर्यमात्राआणि भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान यांचा वाढता वापर हा याच परिवर्तनाचा नवा अध्याय आहे.अनुभवातून निवड ते विज्ञानातून निवडभारतीय उपखंडात पशुपालनाची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. सिंधू संस्कृतीच्या काळातही गायी,म्हशी,यांसारखे पशू मानवी जीवनाचा भाग होते. नदीम्हशीच्या पाळीवीकरणाबाबतच्या आनुवंशिक अभ्यासांमध्ये तिचा उगम भारतीय उपखंडाशी जोडला जातो आणि तिच्या पाळीवी करणाची प्रक्रिया सिंधू संस्कृतीच्या उत्तर टप्प्यापूर्वी किंवा त्या आसपास सुरू झाल्याचे संकेत मिळतात.त्या काळात उत्कृष्ट जनावरांची निवड ही निरीक्षण आणि अनुभवावर आधारित होती. ज्या गायी अधिक दूध देत,ज्या म्हशी निरोगी राहत किंवा ज्या पशूंची संतती चांगली होत, त्यांचे संगोपन केले जात असे. पिढ्यान्पिढ्या अशा निवडीमधून स्थानिक पशुधनाच्या विविध जाती आणि प्रकार विकसित झाले.आज त्याच प्रक्रियेला विज्ञानाने नवी दिशा दिली आहे. अनुवंशिक गुणवत्ता आता केवळ बाह्य रूप किंवा अनुभवावरून ठरवली जात नाही; निवडक पैदास, वीर्यमात्रा, भ्रूण आणि आधुनिक प्रजनन तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च गुणवत्तेची पुढील पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पारंपरिक गोठ्यातील एक वासरू ते प्रयोगशाळेतून अनेक उच्च गुणवत्तेची वासरे नैसर्गिक पद्धतीत किंवा पारंपरिक प्रजनन पद्धतीत एका गायीपासून साधारणपणे वर्षाला एक वासरू मिळते. त्यामुळे एखाद्या अत्यंत उच्च गुणवत्तेच्या दाता गाईचे आनुवंशिक गुण पुढील पिढीत मोठ्या प्रमाणात नेण्यासाठी अनेक वर्षे लागतात.याच ठिकाणी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान मोठा बदल घडवते. उच्च अनुवंशिक गुणवत्ता असलेल्या दाता गाईच्या स्त्रीबीजांचे संकलन करून प्रयोगशाळेत निवडक उच्च गुणवत्तेच्या वळूच्या वीर्याने फलन केले जाते. त्यातून तयार झालेला भ्रूण प्राप्तकर्ता गाय किंवा म्हशीच्या गर्भाशयात प्रत्यारोपित केला जातो. त्यामुळे एका उच्च गुणवत्तेच्या दाता गाईच्या आनुवंशिक क्षमतेचा मोठ्या संख्येने पुढील पिढीत प्रसार करणे शक्य होते.या तंत्रज्ञानामुळे एका उच्च गुणवत्तेच्या दाता गाईपासून वर्षभरात ४० ते ५० उच्च दर्जाची वासरे मिळविण्याची क्षमता निर्माण होऊ शकते. म्हणजेच, पूर्वी एका उत्कृष्ट गाईची गुणवत्ता एका वासरापुरती मर्यादित राहायची; आता त्याच आनुवंशिक क्षमतेचा अनेक वासरांमध्ये प्रसार करता येतो. याच अर्थाने/हे पशुपालनातील 'टेस्ट ट्यूब बेबी' तंत्रज्ञान म्हणून ओळखले जाते.नर की मादी? आता निवडीला विज्ञानाची जोडपशुपालकाच्या दृष्टीने दुग्धव्यवसायात मादी वासराला विशेष आर्थिक महत्त्व आहे. पारंपरिक कृत्रिम रेतनात नर किंवा मादी वासरू जन्मण्याची शक्यता साधारण ५०:५० असते. मात्र, लिंग निश्चित वीर्यमात्रा म्हणजे तंत्रज्ञानामुळे मादी वासरू जन्मण्याची शक्यता ९० टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे उद्दिष्ट साध्य करता येते.या प्रक्रियेत मादी संततीसाठी आवश्यक '' गुणसूत्र असलेले शुक्राणू निवडून वीर्यमात्रा तयार केली जाते. यामुळे गोठ्यात दूध उत्पादनासाठी उपयुक्त कालवडींची संख्या वाढविण्याची संधी मिळते.उच्च वंशावळीच्या वळूची वीर्यमात्रा वापरल्यास अधिक दूध उत्पादनक्षम कालवडी मिळण्याची शक्यता वाढते. त्याचवेळी नर वासरांच्या संगोपनावरील अनावश्यक खर्चात बचत होऊ शकते.मात्र हे तंत्रज्ञान सर्वच जनावरांसाठी सरसकट वापरण्याऐवजी सुदृढ कालवडी तसेच प्रथम किंवा द्वितीय वेतातील निरोगी गाई–म्हशी, योग्य माजाची वेळ आणि तज्ज्ञ पशुवैद्यकीय मार्गदर्शन यांचा विचार करून वापरणे आवश्यक आहे. कारण सेक्स सॉर्टेड वीर्यमात्रेतील शुक्राणूंची संख्या तुलनेने कमी असल्याने सामान्य वीर्यमात्रेपेक्षा गर्भधारणेचे प्रमाण काहीसे कमी असू शकते.'वंश जपणे'ते'वंश सुधारणा'प्राचीन पशुपालकासाठी आपल्या परिसरातील पशुधनाची जात आणि गुणधर्म टिकविणे महत्त्वाचे होते. आधुनिक पशुविज्ञान त्यापुढे जाऊन वंशसंवर्धनासोबत अनुवंशिक सुधारणा करण्याची संधी देत आहे. गिर, साहिवाल, थारपारकर या राष्ट्रीय जातींसोबत महाराष्ट्रातील खिलार, डांगी, देवणी, लाल कंधारी, गवळाऊ या गोवंशांच्या तसेच नागपुरी, मराठवाडी आणि पंढरपुरी म्हशींच्या संवर्धनासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत आहे.याचा अर्थ केवळ अधिक दूध देणारे पशुधन तयार करणे एवढाच नाही.स्थानिक हवामानाशी जुळणारे, रोगप्रतिकारक क्षमता असलेले, शारीरिकदृष्ट्या सक्षम आणि चांगली दूध उत्पादनक्षमता असलेले पशुधन निर्माण करणे,हा या तंत्रज्ञानाचा व्यापक उद्देश आहे.महाराष्ट्राची प्रयोगशाळेतून श्वेतक्रांतीकडे वाटचालमहाराष्ट्रात भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाच्या वापरात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत राज्यातील शासकीय, निमशासकीय आणि खासगी संस्थांच्या माध्यमातून १४,६९८ भ्रूण प्रत्यारोपण करण्यात आले असून त्यातून २,४७३ उच्च गुणवत्तेच्या वासरांचा जन्म झाला आहे.पुण्यातील ताथवडे येथील बाह्यफलन व भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा मार्च २०२१ पासून महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या अंतर्गत कार्यरत आहे. आतापर्यंत येथे २४० सत्रे पूर्ण झाली असून ७८० भ्रूण तयार, ५५६ भ्रूण प्राप्तकर्ता जनावरांमध्ये प्रत्यारोपित आणि १५० भ्रूण गोठवून ठेवण्यात आले आहेत.जुलै २०२६ पर्यंत या तंत्रज्ञानातून ६३ वासरांचा जन्म झाला असून ५० हून अधिक गाभण जनावरांकडून पुढील वासरांच्या जन्माची अपेक्षा आहे.ताथवडे प्रयोगशाळेतील कामगिरीतील एक विशेष टप्पा म्हणजे २३ जुलै २०२२ रोजी 'शीतल' या देशातील पहिल्या पंढरपुरी म्हशीच्या बछडीचा भ्रूण प्रत्यारोपणातून झालेला जन्म. तसेच, मुऱ्हा म्हशीमध्ये एकाच स्त्रीबीज संकलनातून चार रेडकांचा जन्म झाल्याची नोंदही या क्षेत्रातील महत्त्वाची उपलब्धी आहे.महागडे तंत्रज्ञान पशुपालकांच्या गोठ्यापर्यंतअत्याधुनिक तंत्रज्ञानाचा सर्वात मोठा प्रश्न त्याची किंमत असतो. म्हणूनच संशोधन प्रयोगशाळेत निर्माण झालेले तंत्रज्ञान प्रत्यक्ष पशुपालकाच्या गोठ्यापर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. लिंग निश्चित वीर्यमात्रेचा मूळ खर्च साधारण रु.१,२०० ते रु.१,५०० असताना महाराष्ट्र शासनाने संबंधित कंपन्यांशी करार करून ती रु. ५७५ प्रति मात्रा या दराने उपलब्ध करून घेतली आहे. केंद्र शासनाचे ४५ टक्के, राज्य शासनाचे ३० टक्के अनुदान आणि /सहकारी दूध संघामार्फत रु.१०० मदत अशा सवलतींमुळे पशुपालकांना ही वीर्यमात्रा अवघ्या रु.८१ प्रति मात्रा या दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे.डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत सुमारे ३.६६ लाख वीर्यमात्रांचे वितरणझाले आहे. याचबरोबर राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत स्वदेशी सेक्स सॉर्टेड सिमेन तंत्रज्ञान विकसित होत आहे. महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ आणि यांच्यातील सामंजस्य करार अंतिम टप्प्यात असून, भविष्यात हे तंत्रज्ञान आणखी कमी दरात उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.गोशाळेतील कमी उत्पादनक्षम गायही आता 'प्राप्तकर्ता'आधुनिक तंत्रज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे उच्च अनुवंशिक गुणवत्तेचे भ्रूण वाढविण्यासाठी प्रत्येक जनावर उच्च गुणवत्तेचे असणे आवश्यक नाही.कमी दूध देणाऱ्या किंवा स्थानिक गाई–म्हशींचा प्राप्तकर्ता/दायी जनावर म्हणून उपयोग करता येतो. म्हणजेच, एखाद्या गोठ्यातील कमी उत्पादनक्षम जनावरालाही उच्च गुणवत्तेच्या वासराच्या जन्मप्रक्रियेत सहभागी करून घेता येते.दि. ५ ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार गोशाळा आणि सामान्य पशुपालकांनाही हे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात आले आहे. भ्रूण प्रत्यारोपणातून निरोगी वासराचा जन्म झाल्यास संबंधित पशुपालक किंवा गोशाळेला रु.१० हजार प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येते. त्यामुळे पशुधन संवर्धनासोबत ग्रामीण भागात अतिरिक्त उत्पन्नाचा मार्गही निर्माण होत आहे.प्रत्येक महसुली विभागात प्रयोगशाळातंत्रज्ञानाचा लाभ काही मोजक्या केंद्रांपुरता मर्यादित न ठेवता तो राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रत्येक महसुली विभागात भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ताथवडे येथील प्रयोगशाळा कार्यान्वित असून मुंबई विभागासाठी पेण, नागपूरसाठी हेटीकुंडी, छत्रपती संभाजीनगरसाठी हरसूल, नाशिकसाठी लोणी बुद्रुक आणि अमरावती विभागासाठी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,अकोला येथे प्रयोगशाळा उभारण्याची कार्यवाही सुरू आहे.यामुळे प्रयोगशाळा आणि पशुपालक यांच्यातील अंतर कमी होणार आहे.१०० टक्के अनुदानातून तंत्रज्ञानाची दारे खुलीआधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ आर्थिकदृष्ट्या सक्षम पशुपालकांपुरता मर्यादित राहू नये, यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत पात्र पशुपालकांना आणि या दोन्ही तंत्रज्ञानाचा लाभ १०० टक्के अनुदानावर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय गोकुळ मिशनअंतर्गतही पशुपालकांसाठी विविध सुविधा उपलब्ध आहेत.यामुळे तंत्रज्ञान हे केवळ प्रयोगशाळेतील संशोधन न राहता प्रत्यक्ष ग्रामीण अर्थव्यवस्थेचा भाग बनत आहे.हजारो वर्षांची परंपरा, आता नव्या विज्ञानाच्या हातातभारतातील पशुपालनाची कहाणी ही माणूस आणि पशू यांच्या सहजीवनाची कहाणी आहे. हजारो वर्षांपूर्वी पशुपालकाने आपल्या अनुभवातून चांगली गाय, चांगली म्हैस किंवा चांगली शेळी निवडली. पिढ्यान्पिढ्या त्या निवडीमधून पशुधनाच्या विविध जाती विकसित झाल्या. आज त्याच निवडीला आनुवंशिक विज्ञान, कृत्रिम रेतन, सेक्स सॉर्टेड सिमेन, , आणि भ्रूण प्रत्यारोपण यांची जोड मिळाली आहे.पूर्वी "चांगले जनावर कोणते?" हा प्रश्न अनुभवातून सोडविला जात होता.आज "चांगल्या जनावराची आनुवंशिक गुणवत्ता पुढील पिढीत अधिक प्रभावीपणे कशी पोहोचवायची?" याचे उत्तर विज्ञान देत आहे.पूर्वी एका उत्कृष्ट गाईकडून वर्षाला एक वासरू मिळणे ही नैसर्गिक मर्यादा होती. आज त्याच उच्च गुणवत्तेच्या दाता जनावराच्या आनुवंशिक क्षमतेचा अनेक वासरांमध्ये प्रसार करण्याची क्षमता निर्माण झाली आहे.पूर्वी पशुपालकाला नर किंवा मादी वासराच्या जन्माची प्रतीक्षा करावी लागत होती. आज लिंग निश्चित वीर्यमात्रेमुळे मादी कालवडींची शक्यता ९० टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. आणि पूर्वी उत्कृष्ट वंशाची एखादी गाय किंवा म्हैस ही त्या एका गोठ्याची संपत्ती होती; आज तिच्या आनुवंशिक गुणवत्तेचा प्रसार संपूर्ण पशुधन क्षेत्रात करण्याची क्षमता निर्माण झाली आहे.हीच पारंपरिक पशुपालनापासून आधुनिक पशुविज्ञानापर्यंतची खरी झेप आहे. म्हणून महाराष्ट्रातील श्वेतक्रांतीचा पुढील टप्पा केवळ जनावरांची संख्या वाढविण्यात नाही, तर उत्तम अनुवंशिक गुणवत्ता, अधिक दूध उत्पादन, निरोगी पशुधन, कमी खर्च आणि पशुपालकाचे वाढते उत्पन्न यात आहे.गोठ्यातील पारंपरिक पशुपालनाची हजारो वर्षांची परंपरा आता प्रयोगशाळेतील अत्याधुनिक विज्ञानाशी जोडली जात आहे. पशुपालकाच्या अनुभवाला आधुनिक तंत्रज्ञानाची साथ देऊन महाराष्ट्राच्या दुग्धव्यवसायाला अधिक उत्पादक, लाभदायक आणि शाश्वत बनविण्याच्या दिशेने ही नवी श्वेतक्रांतीची वाटचाल आहे.

**(माहिती मुख्य स्रोत:–पशुसंवर्धन विभाग)युवराज पाटील जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

पिंपरी चिंचवड मनपा ११ ऑक्टोंबर ४५ वा वर्धापन दिन
साप्ताहिक प्रगत भारत
वृत्तपत्र विशेषांक व व्हेब न्यूज
जाहिरातीसाठी आजच संपर्क
साधा.मो.नं.९८६०८७७७८९

प्रगत भारत हे साप्ताहिक वृत्तपत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक संपादक दत्तात्रय तानाजी कांबळे. यांनी त्रिमुर्ती मुद्रिका,५४/२६ एम.आय.डी.सी.चिंचवड पुणे–१९ येथे छापून रजि.मुख्य कार्यालय ऑ.नं.२४,साईकृपा भवन, पहिला मजला, पुणे–मुंबई रोड, खराळवाडी, पिंपरी, पुणे–१८ येथून प्रकाशित केले.संपर्क मो. ९८६०८७७७८९, Web:www.pragatbharat.com सदर अंकात प्रसिध्द झालेल्या वृत्तांशी किंवा लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व कायदेशिर बाबी पिंपरी न्यायालयाअधिन.(पी.आर.बी.कायद्यानुसार जबाबदारी)● RNI No. MAH/MAR/2008/25149 ● Dec. No. PHM/SR/136/VIII/2008 Published on Tuesday and Posted on Thursday POSTED AT PIMPRI P.F. POST OFFICE LICENCE NO. Reg. No. PCE/006/2024-2026'pragat Bharat' Weekly News paper is owned,printer & Published by Dattatraya Tanaji Kamble,Printed at shree Trimurti Mudrika 54/26,D-2 lockMIDC,Chinchwad,Pune-411018 ● Editor:Dattatraya kamble Email - pragatbharat@gmail.com, Web:www.pragatbharat.com ●RNI No. MAH/MAR/2008/25149 ● legal disputes under pimpri court jurdion



दररोजच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbharat.com
संपर्क मो–९८६०८७७७८९

## पिंपरी गावातील पवना मित्र मंडळाकडून 'पवनेचा राजा पुरस्कार' प्रदान; विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

**पिंपरी:–पिंपरी गावातील पवना मित्र मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा"पवनेचा राजा पुरस्कार २०२६" देऊन गौरव करण्यात आला. सामाजिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी कार्याची परंपरा जपत मंडळाने समाजातील विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा** सन्मान केला.

यावर्षी सांप्रदायिक क्षेत्रातील कार्यासाठी ह.भ.प.सतीश ज्ञानोबा गव्हाणे, सामाजिक क्षेत्रासाठी अशोक गणपत नाणेकर,पत्रकारिता क्षेत्रासाठी मिलिंद गोविंद भुजबळ (दैनिक सकाळ),क्रीडा क्षेत्रासाठी पै.खंडू बबन वाळुंज (प्रथम मावळ केसरी),कामगार क्षेत्रासाठी रमेश लक्ष्मण वाघेरे(सेंच्युरी एन्का), शैक्षणिक क्षेत्रासाठी संपत जगताप सर,वैद्यकीय क्षेत्रासाठी डॉ.संजय देवधर आणि उद्योजक क्षेत्रासाठी करण सिंघी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.तसेच कु.विशाखा अविनाश बालकवडे(नायब तहसीलदार) आणि अविनाश केदारी(API) यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.




यावेळी चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून आळंदी ते पंढरपूर वारीदरम्यान वारकरी भाविकांना आरोग्यसेवा पुरविणारे डॉ.देविदास शेलार यांचा त्यांच्या निस्सीम सेवाभावाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.दरम्यान,पिंपरी–चिंचवड शहरातील उद्योजक तसेच चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष विजय पांडुरंग जगताप हे गोसेवा,वारकरी सेवा,धार्मिक, सामाजिक, राजकीय,कला,क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रांत सातत्याने योगदान देत असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेत मंडळाच्या वतीने त्यांना "विशेष समाजसेवा गौरव सन्मानपत्र" प्रदान करण्यात आले.या पुरस्कार वितरण सोहळ्यास मंडळाचे अध्यक्ष विशाल विष्णुपंत वाघेरे, कार्याध्यक्ष व माजी विरोधी पक्षनेते दत्तात्रय वाघेरे, माजी नगरसेवक हनुमंत नेवाळे, प्रभाकर वाघेरे,ह.भ.प.व माजी नगरसेवक आप्पा बागल,नगरसेवक डब्बू असवाणी,शिवस्मारक समिती अध्यक्ष दत्तोबा नाणेकर,अण्णा कापसे,मनीष पंजाबी,गणेश ढाकणे, महादेव वाळुंजकर,दीपिका कापसे,अनिता वाळुंजकर,शारदाताई मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.पवना मित्र मंडळाचा ५४ वर्षांचा सामाजिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी वारसा पुढे नेत समाजातील विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## पिं.–चिं.महापालिकेचा ४४ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा होणार

(पान १ वरून)

तील व्हीएमडीच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या विकासकामांची माहिती आणि वर्धापन दिनानिमित्त संदेश प्रसारित करण्यात येणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे पुस्तकांच्या प्रती देऊन स्वागत करण्याचेही प्रस्तावित आहे.वर्धापन दिनाच्या सर्व कार्यक्रमांचे नियोजनबद्ध व समन्वयपूर्वक आयोजन करण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक पूर्वतयारी वेळेत पूर्ण करावी,तसेच कार्यक्रमांमध्ये अधिकारी–कर्मचारी आणि नागरिकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी,अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

## शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने १० लाखांची फसवणूक;पिंपरी पोलिसांत गुन्हा दाखल

**पिंपरी:**–शेअर मार्केटमध्ये मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून १० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना एप्रिल २०२४ ते १९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पिंपरी गाव परिसरात घडली.याप्रकरणी रवींद्र सुभाषराव शिलवंत (वय ४८,रा.श्री साई अपार्टमेंट, मंजुळा मासुळकर पार्क, पिंपरीगाव,पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार उमेश हरिराम कलानी (वय अंदाजे २८, रा. कृष्णा सायकलसमोर, पिंपरी, पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्यामाहितीनुसार,आरोपीने स्वतः ला यू.के.ग्रुप ऑफ कंपनीशी संबंधित असल्याचे सांगून फिर्यादी व इतरांना शेअर मार्केटमध्ये १० लाख रुपयांची गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. गुंतवणूक केल्यानंतर पहिल्या दहा महिन्यांत दरमहा एक लाख रुपये, म्हणजेच एकूण दहा लाख रुपये परत मिळतील तसेच त्यावरील नफाही दिला जाईल,असे आश्वासन आरोपीने दिले होते.मात्र,गुंतवणुकीनंतर आरोपीने ना मूळ रक्कम परत केली, ना कोणताही परतावा दिला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी पिंपरी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक चिरंजीव दलालवाड हे करीत आहेत.

## आशाताई बुचके यांच्या निधनाने सामाजिक,राजकीय क्षेत्राची मोठी हानी–आमदार महेश लांडगे

**भोसरी:**–जुन्नर तालुक्यातील कणखर आणि संघर्षशील नेतृत्व,गोरगरीब,वंचित आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सदैव आवाज उठविणाऱ्या आशाताई बुचके यांच्या निधनाची वार्ता अत्यंत दुःखद आणि मन हेलावून टाकणारी आहे.त्यांच्या निधनाने जुन्नर तालुक्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक रणरागिणी,संवेदनशील नेत्या आणि आशादायी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला विनम्र अभिवादन करीत,त्यांच्या



स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर आशाताई बुचके यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो. त्यांच्या कुटुंबीयांना, आप्तेष्टांना,सहकाऱ्यांना आणि असंख्य समर्थकांना हे अपरिमित दुःख सहन करण्याची शक्ती देवो,भावपूर्ण श्रद्धांजली आशाताई बुचके यांना महेश लांडगेआमदार, भाजपा, यांनी केली आहे

## पिंपरीत काळ्या काचा,फॅन्सी नंबर प्लेट असलेली थार कार पोलिसांनी घेतली ताब्यात

**पिंपरी:**–वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पिंपरी–चिंचवड वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून काळ्या काचा आणि फॅन्सी नंबर प्लेट लावून फिरणाऱ्या महिंद्रा थार कारवर कारवाई करण्यात आली आहे.

पिंपरी वाहतूक पोलिसांनी एमएच १४ एलजे २५२५ क्रमांकाच्या थार कारची तपासणी करून वाहन ताब्यात घेतले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित थार कारच्या काचांवर नियमानुसार परवानगी नसताना काळी फिल्म लावण्यात आली होती. तसेच वाहनावर नियमबाह्य फॅन्सी नंबर प्लेट बसविण्यात आली होती. या प्रकारामुळे वाहनाची ओळख पटविण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी वाहनचालका विरोधात मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करत वाहन जप्त केले आहे. शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर विशेष मोहीम राबविण्यात येत असून काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट, सायरन, बेकायदा फ्लॅश लाईट आणि इतर नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करून कायदेशीर स्वरूपातील नंबर प्लेटचा वापर करावा तसेच वाहनांमध्ये कोणतेही अनधिकृत बदल करू नयेत, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## अनुसूचित जातीचा ३९९ कोटींचा निधीवळवला;बहुजन समाज पार्टी आक्रमक!

**नांदेड:मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या जुलै महिन्याच्या निधीसाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती घटकातील महिलांसाठी आरक्षित असलेला तब्बल ३९९ कोटी ५३ लाख रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यात आला असल्याची माहिती आहे.**

मागासवर्गीय घटकांच्या विकासासाठी असलेला हक्काचा निधी इतरत्र वळवण्यात आल्याने दलित व सामाजिक संघटनांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.या निर्णयाच्या निषेधार्थ बहुजन समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी आक्रमक भूमिका घेत मुख्यमंत्री तसेच संबंधित शासनाला इमेलद्वारे तातडीचे लेखी निवेदन पाठवले आहे. तसेच राज्य शासनाच्या संबंधित पोर्टलवर अधिकृत तक्रारही नोंदवण्यात आली आहे.

इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी निवेदनातून स्पष्ट केले आहे की, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या किंवा मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या विरोधात आपण नाही, मात्र मागासवर्गीय व दलित घटकांच्या हक्काचा निधी अशा प्रकारे परस्पर वळवणे हे थेट संवैधानिक अधिकारांवर आघात करणारे आहे. याचा बहुजन समाज पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे.

सामाजिक न्याय विभागाचा निधी अशा प्रकारे वळवल्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, वसतिगृहे, कौशल्य विकास योजना तसेच इतर महत्त्वपूर्ण कल्याणकारी योजनांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

यापूर्वीही अनुसूचित जाती घटकांच्या हक्काच्या निधीसाठी संघर्ष करावा लागत असताना उपलब्ध निधी अन्य योजनांसाठी वापरला जात असल्याने मूळ घटकांच्या विकासाला मोठी खीळ बसण्याची भीती या निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. यासाठी बहुजन समाज पक्षाने शासनाकडे प्रमुख मागण्या केल्या आहेत:(१) मागासवर्गीय घटकांच्या विकासाचा निधी इतर योजनांसाठी वळवणे तात्काळ थांबवावे.(२) सामाजिक न्याय विभागाचा निधी केवळ आणि केवळ संबंधित मागासवर्गीय घटकांच्या हक्कांसाठी पूर्णपणे सुरक्षित ठेवावा. (३)वळवण्यात आलेला निधी संबंधित अनुसूचित जाती घटकांच्या योजनांसाठी तातडीने पूर्ववत करावा.(४) सर्व मागासवर्गीय महामंडळाना जास्तीचा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.(५) सर्व मागासवर्गीय महामंडळाचे थकित कर्ज माफ करण्यात यावे.शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर बहुजन समाज पक्षाच्या वतीने संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्य सचिव, सामाजिक न्याय विभाग, पुणे आणि मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

### कार्यकारी अभियंता,
### कुकडी पाटबंधारे विभाग क्र–१ नारायणगाव,तालुका जुन्नर,जिल्हा पुणे

ई–मेल:– eekid1narayangaon@gmail.com दुरध्वनी क्र.–(०२१३२)–२४२०१६

### ई–निविदा सूचना क्रमांक–५ सन २०२६–२०२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता,कुकडी पाटबंधारे विभाग,पुणे–१ नारायणगाव तालुका जुन्नर,जि.पुणे जलसंपदा विभाग,महाराष्ट्र शासन हे सक्षम निवीदाकारांकडून खालील कामाकरीता ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वार(ऑनलाईन)निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत.सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.
निविदा स्वीकरण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता,कुकडी पाटबंधारे विभाग,पुणे–१ नारायणगाव तालुका जुन्नर,जि.पुणे यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अंक्र. | कामाचे नाव | निवीदेची किंमत (रू) |
|---|---|---|
| १. | कुकडी सिंचन शाखा,नारायणगाव अंतर्गत को.प.बंधारा वैशाखखेड,वडगाव कांदळी,बोरो (बु.)जाधव वाडी साकोरी,पारगाव(मंगरूळ) ता.जुन्नर जिल्हा पुणे या को.प.बंधाऱ्याचे बर्गे बसविणे. | १६,४३,५६०/- |
| २. | कळंब सिंचन शाखा,कळंब अंतर्गत को.प.बंधारा,वडगाव काशिंबे,सुलतानपुर,कळंब चांडोली, अवसरी,पिंपळगाव,पारगावकाठापूर,निरगुडसर,देवगाव व चांडोह ता.आंबेगाव,जिल्हा पुणे या को.प.बंधाऱ्याचे बर्गे बसविणे. | ४२,०१,२२९/- |
| ३. | मंचर सिंचन शाखा,मंचर अंतर्गत को.प.बंधारा,चांडोह व कवठे फाकटे साबळेवाडी,निमगाव दुडे,(कुंड),निमगाव दुडे(तामकरवाडी) अमदाबाद व अण्णापुर तालुका शिरूर जिल्हा पुणे या को.प.बंधाऱ्याचे बर्गे बसविणे. | १६,२५,७७२/- |

१)जिल्हा :– **पुणे**
**२)ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक १७/०९/२०२६ ते २४/०९/२०२६**
**३)ई–निविदा उघडणे :– दिनांक २८/०९/२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे**

**जा.क्र.कुपावि१/लेशा/निविदा/३३३३२/सन–२०२६**
**कुकडी पाटबंधारे विभाग,पुणे–१ नारायणगाव तालुका जुन्नर,जि.पुणे**
**दिनांक :०८/०९/२०२६**

**सही/-**
**(जी.बी.नान्नोर)**
**कार्यकारी अभियंता**
**कुकडी पाटबंधारे विभाग,पूणे–१ नारायणगाव**

**जिमाका/पुणे/जाहिरात/२५९/२०२६–२७**

# विकासकामांसाठी छाटलेल्या झाडांचे लाकूड स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी मोफत उपलब्ध होणार; स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची माहिती

**पिंपरी:-शहरातील विकासकामे, रस्ते रुंदीकरण आणि विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर झाडांची छाटणी केली जाते. या छाटल्या जाणाऱ्या झाडांचे लाकूड आता वाया न घालवता महापालिकेच्या वतीने शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये अंत्यविधीसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी या महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णयाची माहिती दिली.**

याबाबत संबंधित विभागाला त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. शहरात विविध विकासकामांदरम्यान झाडांची छाटणी केली जाते. या छाटणीदरम्यान निघणारे लाकूड अनेकदा इकडे-तिकडे टाकून दिले जाते किंवा अयोग्य व्यवस्थापनामुळे ते वाया जाते. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेत स्थायी



समितीने या लाकडांचा योग्य वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन धोरणांतर्गत, छाटणीतून मिळणारी ही सर्व लाकडे थेट शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये पाठवली जातील.या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी लाकूड सहज उपलब्ध होणार आहे. शोकसागरात बुडालेल्या किंवा आपत्कालीन परिस्थितीत असणाऱ्या नागरिकांना बाजारातून वेगळी लाकडे विकत आणण्याची कोणतीही गरज भासणार नाही. एरवी कचऱ्यात किंवा अयोग्य ठिकाणी पडून नष्ट होणाऱ्या या लाकडांचा अत्यंत पवित्र आणि सामाजिक कामासाठी सदुपयोग केला जाणार असून, लवकरच महापालिकेच्या वतीने या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होईल.''शहरात विविध कारणांमुळे जी झाडे छाटली जातात, त्यातून निकोप आणि उत्तम दर्जाचे लाकूड उपलब्ध होते. हे लाकूड फेकून देऊन वाया घालवण्याऐवजी आम्ही धोरणात्मक निर्णय घेतला आहे. ही सर्व लाकडे स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी मोफत उपलब्ध करून दिली जावीत. यासाठी नागरिकांना वेगळी लाकडे आणण्यासाठी कोणतीही कसरत करावी लागणार नाही.''अभिषेक बारणे (सभापती, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका)

# युवा मोर्चाच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान'; कार्डचे वाटप

**पिंपरी:-भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा,पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात आले.या अभियानांतर्गत भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर जिल्हा सचिव जालिंदर महादेव काटे यांच्या पुढाकारातून नागरिकांना कार्डचे वाटप करण्यात आले.**

नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी तसेच विविध सार्वजनिक सुविधांचा लाभ घेण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या कार्डची माहिती देत त्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाला सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक,महिला, प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव अजितदादा कुलथे तसेच भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष दिनेश यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शक भरत अण्णा काटे, मच्छिंद्र काटे, मारुती काटे,कालिदास ढवळे यांच्या सह



भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याच भावनेतून पिंपरी-चिंचवड शहरातही युवा मोर्चाच्या माध्यमातून नागरिकांच्या उपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. 'सेवा हीच संघटनेची ओळख' या भावनेतून समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक सुविधा व माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या अभियानाच्या माध्यमातून करण्यात आला.या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत कार्डचा लाभ घेतला. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित उपयुक्त उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जालिंदर महादेव काटे, सचिव,भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# 'ड' प्रभागातील नवीन अग्निशमन केंद्राच्या जागा हस्तांतराचे काम गतीने पूर्ण करा; वाहन व मनुष्यबळ वाढविण्याची नाना काटे यांची मागणी

**पिंपरी:-**पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या,उंच इमारती आणि गृहसंकुलांची संख्या लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे सांगत विरोधी पक्षनेते तथा विद्यमान नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे विविध मागण्या केल्या आहेत.

ड प्रभागांतर्गत विकसित होणाऱ्या नवीन अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक जागा तातडीने हस्तांतरित करून केंद्राच्या उभारणीच्या कामाला गती द्यावी,अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे. नवीन अग्निशमन केंद्र कार्यान्वित झाल्यास परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत अधिक जलद आणि प्रभावी सेवा मिळू शकेल,असे त्यांनी निवेदनात



नमूद केले आहे.तसेच ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सध्या कार्यरत असलेल्या अग्निशमन केंद्रावर उपलब्ध वाहनांची संख्या अपुरी असल्याचे सांगत,अतिरिक्त अग्निशमन वाहने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.एखादे वाहन अन्य ठिकाणी कार्यरत असल्यास संबंधित भागात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास अडचणी येऊ शकतात, त्यामुळे आवश्यक संख्येने वाहने कायमस्वरूपी उपलब्ध ठेवावीत, असे काटे यांनी म्हटले आहे.याशिवाय अग्निशमन अधिकारी,जवान आणि इतर कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून मनुष्यबळ बळकट करावे,जेणेकरून उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करून आपत्कालीन घटनांवर तातडीने प्रतिसाद देता येईल,अशी मागणीही करण्यात आली आहे. निवेदनात नवीन अग्निशमन केंद्रासाठी जागा हस्तांतरित करणे, प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून कामाला गती देणे, निर्धारित कालावधीत केंद्र पूर्ण करून नागरिकांच्या सेवेत दाखल करणे, विद्यमान केंद्रावर वाहनांची संख्या वाढविणे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षिततेशी हा विषय थेट संबंधित असल्याने महापालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे.

# भाजपा युवा मोर्चाच्या सेवाभावी उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप..!भाजपा युवा मोर्चाच्या सेवाभावी उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप..!





**पिंपरी:-भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा,पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा यांच्या वतीने मोरवाडी येथील रेणुका देवी विद्या मंदिर येथे विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके,पेन तसेच विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.**

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे,गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सेवाभावी कार्य पोहोचावे,या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे संयोजक मनोज मीरा मोहन घोडेकर तसेच आदम सिकंदर मुलानी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. रेणुका देवी विद्या मंदिरचे अध्यक्ष व नगरसेवक तुषार हिंगे तसेच संस्थापक सोनाली हिंगे यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्याबद्दल आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी भाजपा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस वैशाली खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष दिनेश यादव, भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे, भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सरचिटणीस राजेश डोंगरे,चिटणीस निखिल शहाणे, गोपाल मंडल, नितीन साळी, मंडल अध्यक्ष अक्षय कविटकर, विठ्ठल गवळी महाराज, जयदीप करपे,सामाजिक कार्यकर्ते इम्रान पठाण तसेच भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.''विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केलेली छोटीशी मदतही त्यांच्या भविष्यासाठी मोठी प्रेरणा ठरू शकते,'' या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी अशा सेवाभावी उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.भाजपा युवा मोर्चाच्या माध्यमातून युवकांना सामाजिक कार्याशी जोडत समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर भर दिला जात असून,विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम त्याच सामाजिक बांधिलकीचा एक भाग असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद, त्यांच्या शिक्षणासाठी मिळालेली मदत आणि समाजसेवेचा संदेश हीच या उपक्रमाची खरी प्रेरणा ठरली.

# गणराया 'या मस्तवाल सत्ताधाऱ्यांना सद्बुद्धी द्या',राज्यातील जनतेला सुखी ठेवा..!

## माजी विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादासजी दानवे यांचे प्रतिपादन



**पिंपरी:-महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादासजी दानवे यांनी पिंपरी-चिंचवड शहराचा दौरा केला. दापोडी येथील शिवसेना विभागीय कार्यालयापासून त्यांच्या दौऱ्याला सुरुवात झाली. यावेळी शहराध्यक्ष चेतन पवार, यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, आजी-माजी पदाधिकारी, महिला पदाधिकारी, युवासेना तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

दरम्यान,दानवे यांनी पिंपरी येथील रोमी संधू यांच्या मंडळास भेट दिली.त्यानंतर रहाटणी येथील संघर्ष तरुण मित्र मंडळास भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पुढे त्यांनी पिंपरी-चिंचवड शिवसेना शहरप्रमुख चेतन पवार यांच्या निवासस्थानी भेट दिली. विविध गणेश मंडळे, शिवसेना शाखा,पदाधिकारी आणि ज्येष्ठ शिवसैनिकांच्या भेटीगाठीही त्यांनी घेतल्या. यावेळी बोलताना अंबादास दानवे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. राज्यातील विविध भागांतील दुष्काळी परिस्थितीचा उल्लेख करत गणरायाचरणी त्यांनी ''राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. दुष्काळापासून मुक्ती मिळू दे, धो-धो पाऊस येऊ दे आणि शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना जनतेने योग्य तो धडा शिकवावा. सत्ताधाऱ्यांना जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची सद्बुद्धी द्या,'' अशी प्रार्थना त्यांनी केली. यावेळी बहुसंख्येने शिवसैनिक उपस्थित होते

निर्विकार आयुर्वेद हॉस्पिटल
CASHLESS AYURVEDA HOSPITAL
आयुर्वेद व पंचकर्म आता कॅशलेस स्वरूपात
• केंद्रीय कर्मचारी
• केंद्रीय पेन्शनर्स
• विमा धारक
जयगणेश साम्राज्य भोसरी पुणे
7776008686